# प्रकरण चार

## आरोग्य विभाग

**4.374 आरोग्य विभाग अंतर्गत 31 मार्च अखेर केलेल्या खर्चाबाबत**

**पंचायत समिती विक्रमगड, जिल्हा पालघर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदरबाबत 5 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 1,17,868/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय दिनांक 27/08/2017 नुसार कामाचा आराखडा किंवा आवश्यक लागणाऱ्या खरेदीबाबत नियोजन करून 15 फेब्रुवारीपर्यंत कामे किंवा खरेदी करणे असतांनाही 31 मार्च रोजी नियमबाह्य खर्च केला आहे.

2) जिल्हा परिषद व पंचायत लेखासंहिता 1968 चे नियम 83 (3) खरेदी करण्यापूर्वी गुणवत्ता व योग्यता तपासणे आवश्यक आहे. अशी गुणवत्ता व योग्यता तपासणी न करता खरेदी केल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे योग्यताबाबत तपासणी करता आली नाही.

3) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखसं 2014/प्र.क्र.82/भाग-/उद्योग-4, दिनांक 30/10/2015 मधील नियम 8 व 9 मधील शासनाने अधिकृत केलेल्या करारधारकाकडून खरेदी केली नाही.

४) जिल्हा परिषद व पंचायत लेखासंहिता 1968 चे नियम 27 नुसार खर्च आवश्यक असल्याशिवाय धनादेश पारित करू नये, असे असतानाही प्राप्त अनुदान शिल्लक राहू नये, या उद्देशाने वेगवेगळी दरपत्रके मागणी करून खर्च केल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे केलेला खर्च आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

**4.375 मेडिक्लोर खरेदीबाबत.**

**पंचायत समिती संगमेश्वर, जिल्हा रत्नागिरी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 15) -** सदरबाबत रक्कम रुपये 99,993/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) मेडिक्लोर खरेदी करण्यापूर्वी प्राथमिक आरोग्य केंद्रांकडून मागणी घेतलेली नाही.

2) प्राथमिक आरोग्य केंद्रांना वाटप करण्यात आलेल्या मेडिक्लोरच्या बाटल्या साठा नोंदवहीत नोंदवून वाटप केलेबाबत सदर पुरवठा हा सन 2017-2018 या वर्षात करण्यात आल्यामुळे तपासता आला नाही.

3) लेखापरिक्षण तारखेअखेर तालुकास्तरावर साठा रजिस्टरवर एकूण 555 नग शिल्लक आहेत. ऐन पावसाळ्याच्या दिवसांत मेडिक्लोर खरेदी न करता ते उन्हाळ्याच्या दिवसांत केवळ अनुदान खर्च दाखविणे कामी खरेदी केल्याचे दिसून येते.

4) मागणी नसतांना अनावश्यक खरेदी केल्याचे दिसून येते. कारण 555 नग तालुकास्तरावर शिल्लक आहेत. त्यामुळे पंचायत समिती सेसचे रुपये 13,042.50 एवढा निधी गुंतून पडलेला आहे.

**4.376 विहित मुदतीत MSCIT (संगणक परिक्षा) परीक्षा उत्तीर्ण न झाल्याने झालेल्या अतिप्रदानाबाबत**

**पंचायत समिती नांदगाव, जिल्हा नाशिक, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** पंचायत समिती नांदगाव सन 2016-2017 चे लेखापरिक्षणात आरोग्य विभागाकडील सेवापुस्तकांची पडताळणी केली असता कर्मचारी विहित मुदतीत संगणक परीक्षा उत्तीर्ण झालेले नाहीत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय क्रमांक मातंसे/नस्ती04/224/39, दिनांक 05/05/2007 अन्वंये दिनांक 01/01/2007 ते 31/12/2007 अखेर MSCIT ही संगणक परिक्षा पास करणेबाबत मुदतवाढ देण्यात आलेली असून विहित मुदतीत परीक्षा उत्तीर्ण न होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या दिनांक 01/01/2008 पासून वेतनवाढी रोखणेबाबत सूचित केलेले आहे. परंतु, सदर शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांना वेतन व भत्त्यांचे जादा प्रदान झालेले आहे. गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी अतिप्रदान रक्कमेची खात्री करून मूळ वेतन व त्यावरील

वेळोवेळी अनुज्ञेय महागाई भत्ता, घरभाडे व इतर भत्ते याची प्रथम खात्री करून अतिप्रदानाची रक्कम रुपये 6,51,360/- संबंधिताकडून वसुल करण्यात येवून शासन सदरी भरणा करावी

2) तसेच, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण 2000/प्र.क्र. 61/ 2001/39, दिनांक 19/03/2003 नुसार दिनांक 19/03/2003 किंवा त्यानंतर नव्याने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत उक्त शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**4.377 पंचायत समिती सेस अंतर्गत सन 2016-2017 या वर्षात 3 टक्के सेस योजना अंतर्गत अपंग लाभार्थ्यांना घरघंटी (पिठाची गिरणी) खरेदी करणेबाबत.**

**पंचायत समिती सिन्नर, जिल्हा नाशिक, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 27) -** पंचायत समिती, सिन्नर सन 2016-2017 मध्ये 3 टक्के अपंग, जिल्हा परीषद सेस 100 टक्के अनुदानावर खरेदी करण्यात येणा-या पिठाची गिरणी (घरघंटी) धनादेश देणे बाबत प्रतिलाभार्थी रुपये 17,000/- प्रमाणे 8 लाभार्थ्यांसाठी रक्कम रुपये 1,36,000/- एवढा खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लाभार्थ्याने स्वता खरेदी केलेले घरघंटी हे शासकीय आदेशानुसार व योग्य त्या साईजचे खरेदी केलेबाबत देयकावर प्रमाणपत्र नमूद केलेले नाही. त्यामुळे योग्य त्या साईजचे साहित्य मिळालेबाबत खात्री करता आली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 1094सीआर/2239/34/ 67, दिनांक 01/09/1993 नुसार लाभार्थ्यास लाभ दिल्यानंतर सक्षम अधिका-यांनी पाहणी करुन साहित्याचा उपयोग कशाप्रकारे होत असून याबाबतचा अहवाल सादर करणे बंधनकारक असतांना असा अहवाल दप्तरी नाही. तरी तपासणी अहवाल उपलब्ध करुन लेखापरीक्षणास सादर करावे.

3) अटी शर्तीमधील अट क्रमांक 17 नुसार लाभार्थी हा आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील किंवा त्याचे कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न हे रूपये 50,000/- च्या आत असणे आवश्यक आहे. तथापि, 4 लाभार्थ्यांच्या प्रस्तावांसोबत आर्थिकदृष्टया दुर्बल किंवा उत्पन्नाचा दाखला जोडलेला नसल्याने त्याबाबत तपासणी करता आली नाही

4) अटी शर्तीमधील अट क्रमांक 23 नुसार दिलेल्या अनुदानातुन मंजुर साहित्य हे लाभार्थींनी दिलेल्या विवरण तपशीलाचे स्वत: खरेदी करुन खरेदी केलेची पावती बा.वि.प्र.अ. यांना सादर करावयाची असुन बा.वि.प्र.अ.यांनी सदर साहित्य खरेदी केलेची खातरजमा करावी व स्थळ निरिक्षण करुन फोटोसह वस्तुच्या खरेदी पावतीसह परिपूर्ण असल्याची खातरजमा करुन तसे प्रमाणपत्र सादर करावे. या अटी शर्ती प्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

5) मास्टीर नोंदवहीत लाभार्थी नोंद घेऊन परिपूर्ण नोंदवहीसह दुबार लाभ दिला किंवा कसे याबाबत खात्री करुन मास्टर नोंदवही लेखापरीक्षणाला सादर करावी. दुबार लाभ देण्यात आल्याची बाब निदर्शनास आल्याची बाब निदर्शनास आल्यास दुबार लाभाची रक्कम सबंधित लाभार्थी यांचेकडून वसूल करुन अनुपालन सादर करावे

6) प्राप्त अनुदानापैकी रक्कम रुपये 1,36,000/- इतका खर्च झाला असून उर्वरित रूपये 68,000/- अखर्चित आहे.

**4.378 MS-CIT परिक्षा उत्तीर्ण नसलेबाबत.**

**पंचायत समिती शिरपूर, जिल्हा धुळे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 19) -** महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण2000/प्र.क्र.5/ 2001/39, दिनांक 20/07/2002 व सुधारीत शासन निर्णय क्रमांक सेप्रवि 2002/ प्र.क्र.1412 /12, दिनांक 02/09/2003 अन्वये संगणक परिक्षा शासकीय सेवेतील कर्मचारी यांना उत्तीर्ण होणे आवश्यक असतांना व अंतिम मुदतवाढ दिनांक 31/03/2007 पावेतो देण्यात आलेली असतांना देखील दिनांक 31/03/2017 पर्यंत विहित मुदतीत परिक्षा पास न करणाऱ्या कर्मचारी यांचे वार्षिक वेतनवाढी रोखणेबाबत आदेश आहेत.

शासन निर्णयानुसार वेतनवाढी थांबविण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे एकूण रूपये 5,04,116/- जादा प्रदान संबंधित कर्मचारी यांना झालेले आहे. पंचायत समितीने याबाबत खात्री करून व प्रत्यक्ष सेवापुस्तकाप्रमाणे पडताळणी

करणे आवश्यक आहे. परिशिष्टातील नमूद कर्मचारी यांची जादा वेतन झाल्याबाबत वेतन व भत्ते याची परिगणना करण्यात आलेली आहे. या परिगणीत केलेल्या रक्कमेची पंचायत समिती स्तरावरून पडताळणी करून रक्कम बरोबर असल्याची खात्री करण्यात यावी व जादा अदा करण्यात आलेली रक्कम निश्चित करण्यात यावी.

**4.379 संगणक परीक्षा उत्तीर्ण नसलेने झालेल्या जादा अदाईबाबत.**

**पंचायत समिती दौंड, जिल्हा पुणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12) -** पंचायत समिती, दौंड सन 2016-2017 चे लेखापरीक्षणात प्राथमिक आरोग्य विभागाकडील कर्मचा-यांच्या सेवापुस्तकांची तपासणी केली असता एम.एस.सी.आय.टी. (संगणक) अहर्ता विहीत मुदतीत धारण न केल्याने झालेल्या जादा वेतन अदाईबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्रमांक 2000/प्र.क्र.5/2001/39, दिनांक 20/07/2002 नुसार संगणक अर्हता परीक्षा एम.एस.सी.आय.टी विहीत मुदतीत उत्तीर्ण होणे आवश्यक होते. तसेच महाराष्ट्र शासन, निर्णय क्रमांक सेप्रनि2002/प्र.क्र.14/02/12, दिनांक 02/09/2003 अन्वये वयाची 50 वर्षे पूर्ण केलेल्या शासकीय कर्मचा-यांस संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र सादर करण्यापासून सूट देणेत येत आहे व महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्रमाक मातंस/नस्ती04/224/39, दिनांक 05/05/2007 नुसार मुदतवाढ देणेत आली आहे. त्यानंतर संगणक अर्हता धारण करणा-या कर्मचा-यांच्या वेतनावाढ रोखणेत याव्यात, असे आदेश असतांना काही कर्मचा-यांनी विहीत मुदतीत संगणक अर्हता एम.एस.सी.आय.टी. परीक्षा अथवा उपरोक्त शासन निर्णयामध्ये नमूद केलेप्रमाणे तत्सम संगणक अर्हता धारण केलेली नाही. असे असतांना दिनांक 01/01/2008 पासून सदर कर्मचा-याच्या वेतनवाढी रोखणे आवश्यक होते. परंतु, तशी कार्यवाही न कलेने रक्कम रुपये 27,52,285/- जादा वेतन अदा झाले आहे. सदर जादा वेतन वसूल करुन शासन खाती भरणा करावे.

ज्यादा वेतन अदाई झालेली आहे. जादा वेतन अदाईची वसुली करावी व याप्रमाणे इतर कर्मचारी असल्यास त्यांचीही परिगणना करून रक्कम वासुलात आणावी.

**4.380 प्राथमिक आरोग्य केंद्राकडील बाहयरुग्ण फी उशीरा जमा केलेबाबत व इतर अनियमिततेबाबत**.

**पंचायत समिती खंडाळा, जिल्हा सातारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11 व 22) -** पंचायत समिती, खडांळा जमा रकमांच्या नोंदी पडताळणी करीत असताना प्राथमिक आरोग्य केंद्र, लोणंद यांनी जमा झालेल्या बाहयरुग्ण फीच्या रक्कमांचा भरणा केल्या आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त भरणा कलावधी पहाता विलंबाने भरणा केला आहे. उपरोक्त तपशिल पाहता जमा झाल्यापासून जवळपास सात ते आठ महिना रकमा हाती ठेवल्या आहेत. विलंबाने भरणा केल्या आहेत. सदर रकमा नोंदवहीप्रमाणे जमेत नोंद केल्या असल्या, तरी प्रत्यक्ष जमा सदरी जमा न केल्याने तेवढा काळ लेख्याबाहेर राहिल्या आहेत. तरी व्याजाची परीगणना करून व्याजाची रक्कम वसुल होणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 49 अन्वये आलेली सर्व रक्कम तात्काळ बँकेत जमा करणे आवश्यक आहे. असे असतांना वरीलप्रमाणे उशीरा रकमा भरणा करण्यामुळे नियमबाहयता झाली आहे.

उपरोक्त रकमा उशीरा भरणा करण्याचे प्रयोजन स्पष्ट होणे आवश्यक आहे. प्रत्यक्ष जमेस उशीरा घेतल्याने या रकमांचा तात्पुरता अपहार झाल्याचे दिसुन येते.

3) प्राथमिक आरोग्य केंद्र, लोणंदचे ओपीडी रजिष्ट्रवरला रूपये 5/- प्रमाणे रक्कम जमा घेतली जाते. परंतू, रोखपुस्तक दिनांक 01/04/2016 ते 31/05/2016 पर्यंत रूपये 2/- प्रमाणे नोंद घेतलेली आहे व दिनांक 01/06/2016 पासुन रूपये 5/- प्रमाणे रोखपुस्तकात नोंदी घेतलेल्या आहेत. त्यामधील रूपये 2/- प्रमाणे जिल्हा परिषद निधीत जमा केले जातात. तसेच रूपये 3/- प्रमाणे एनआरएचएम मध्ये जमा केले जातात. परंतू, रूपये 3/- प्रमाणे दिनांक 01/06/2016 ते 25/11/2016 पर्यंत रक्कम रूपये 43,311/- एवढी रक्कम रोखपुस्तकात जमेला आहे. त्यापैकी दिनांक 25/11/2016 रोजी स्टेट बँक खंडाळा खाते क्रमांक 31266879510 या खात्यामध्ये रक्कम

रूपये 41,000/- जमा केल्याची चलान आहे. परंतू, चलनावर कोणी भरलेबाबत प्राथमिक आरोग्य केंद्राचे नाव नाही. याबाबत योग्य खुलासा होणे आवश्यक आहे.

4) दिनांक 19/11/2016 रोजी रोखपुस्तकात 90,015/ एवढी रक्कम शिल्लक होते. त्यामधून रककम रूपये 20,000/- चे वीजदेयक भरले, असे नमुद आहे. परंतू, प्रत्यक्षात प्रमाणक नसल्यामुळे वीजदेयकाची रक्कम भरल्याबाबतची खात्री करता आलेली नाही. नियमानुसार ही रक्कम खर्च करता येत नाही.

5) दिनांक 31/03/2017 रोजी रक्कम रूपये 31,053/- एवढी रक्कम शिल्लक दिसुन येते. परंतू, दिनांक 01/04/2017 ते लेखापरीक्षण कालावधीपर्यंत रोखपुस्तक लिहीले नसल्याने रक्कम रूपये 31,053/- भरणा केल्याबाबतचे चलानसुदधा नाही. त्यामुळे भरणा केल्याची पडताळणी करता आलेली नाही.

6) रोजकीर्द नमुना नंबर 7 मध्ये सन 2016-2017 ची वेतन देयके व इतर वजातीबाबतची कागदपत्रे पहावयास मिळाली नाहीत. प्राथमिक आरोग्य केंद्र, लोणंद यांचे स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा पारगांव खंडाळा यांचेकडील खाते क्रमांक 3526881399 चे बँक विवरणपत्रकाप्रमाणे जमा व खर्च दाखविणेत आलेला आहे. तरी सदर बाबतची आवश्यक ती कागदपत्रके (वेतन देयके व इतर वजाती) सादर करुन खात्री पटवावी.

बँक विवरणपत्रकाप्रमाणे दिनांक 31/03/2017 अखेर रुपये 1,42,948.50/- सदरच्या रकमा आज अखेर भरणा केलेल्या नाहीत. त्यामुळे सदरच्या रकमांचा तात्पुरता अपहार झाल्याची शक्यता आहे. तरी सदरच्या रकमा त्वरीत भरणा कराव्यात अन्यथा संबंधितांना जबाबदार धरुन वसुल कराव्यात.

**4.381 आरोग्य विभागाकडील कर्मचा-यांच्या संगणक अर्हता प्रमाणपत्राबाबत.**

**पंचायत समिती आटपाडी, जिल्हा सांगली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 43) -** पंचायत समिती आटपाडीच्या सन 2016-2017 च्या लेखापरीक्षणात आरोग्य विभागाकडील कर्मचा-यांच्या सेवापुस्तकांची तपासणी केली असता पाच कर्मचारी संगणक अर्हता प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण/सूट नसलेचे किंवा विलंबाने उत्तीर्ण झालेचे किंवा सेवापुस्तकात नोंद नसलेचे आढळून आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त विवरणपत्रात नमूद कर्मचा-यांच्या सेवापुस्तकात संगणक अर्हता प्रमाणपत्राची नोंद आढळून आली नाही किंवा काही कर्मचारी विलंबाने (31/12/2007 नंतर) संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक 20/07/2002, दिनांक 26/05/2004, दिनांक 08/07/2004 व दिनांक 09/06/2006 अन्वये शासकीय सेवेतील गट अ, ब, क मधील अधिकारी कर्मचारी यांनी संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण करुन शासनास प्रमाणपत्र सादर करुन त्याची नोंद सेवापुस्तकात घेणेची आहे. शासन निर्णय क्रमांक भातस/नस्ती/04/224/39, दिनांक 05/05/2007 अन्वये प्रमाणपत्र सादर करावयाची अवधीस दिनांक 31/12/2007 पर्यंत मुदतवाढ देणेत आलेली होती. सदर प्रमाणपत्र जे कर्मचारी दिनांक 31/12/2007 पर्यंत सादर करणार नाहीत, त्यांची वार्षिक वेतनवाढ थांबविणे आवश्यक आहे. तथापि, सदर कर्मचा-यांना नियमित वेतनवाढ देवून त्यांचे वेतन अदा करण्यात आले आहे. तरी सदर कर्मचा-यांचे दिनांक 01/01/2008 पासून संगणक अर्हता प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण किंवा सूट मिळालेच्या तारखेपर्यंतच्या कालावधीत नियमित वेतनवाढ दिल्यामुळे जादा प्रदान झालेल्या वेतनाची रक्कम परिगणित करून शासन सदर भरणा करावी.

**4.382 10 वी 12 वी उत्तीर्ण झालेल्या मुलींना संगणक प्रशिक्षण देणेबाबत**

**पंचायत समिती चंदगड, जिल्हा कोल्हापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 23) -** पंचायत समिती, चंदगड सन 2016-2017 चे लेखापरिक्षणात 10 वी व 12 वी उत्तीर्ण झालेल्या मुलींना संगणक प्रशिक्षण देणेबाबत नस्तीची पडताळणी केली असता, पंचायत समिती, चंदगड उपकर लेखाशिर्षाअंतर्गत महिला व बालकल्याण विभागामार्फत 10 वी व 12 वी पास मुलींना उपकर निधीमधुन संगणक प्रशिक्षण देणेबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए/2013/ प्रक 76/पंरा, दिनांक 24/01/2014 मुद्दा क्रमांक 4 नुसार शासकीय व निमशासकीय नोंकरीसाठी एमएससीआयटी प्रशिक्षण अनिवार्य आहे. सदर प्रशिक्षण

कार्यक्रम हा एम.के.सी.एल. यांचेकडे हस्तांतरीत केलेले असल्याने या महामंडळाने अधिकृत प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण आयोजित करुन प्रशिक्षण संस्थांना आगावु रक्कम आदा करुन प्रशिक्षण पुर्ण करता येईल त्यानुसार कार्यवाही करण्यात आली नाही

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/1998/प्रक्र 78/34, दिनांक 20/10/1999 अन्वये लाभार्थी नोंदवही ठेवणेत येवून दिलेल्या साहित्याची नोंद नोंदवहीमध्ये घेण्यात यावी, जेणेकरुन एकाच कुटुंबातील व्यक्तीना या योजनेचा पुन्हा पुन्हा लाभ मिळणार नाही असे असताना लाभार्थीची गावनिहाय मास्टर नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे लाभार्थी यादीप्रमाणे संबंधीतांना दुबार लाभ दिले नसलेबाबत खात्री करता आली नाही.

3) खालील लाभार्थी हे सन 2016-2017 मध्ये परिक्षा उत्तीर्ण होणेऐवजी यापुर्वी उत्तीर्ण झालेने त्यांना लाभ देता येणार नाही. तसेच परिक्षा उत्त्तीर्ण न झालेल्याना लाभ देण्यात आला आहे.

12 लाभार्थ्यांची प्रत्येकी रक्कम रुपये 3,000/- प्रमाणे रूपये 36,000/- वाटप करण्यात आली आहे. तसेच सदर लाभार्थी यांनी 2016-2017 मध्ये प्रशिक्षण घेणे आवश्यक असता त्या अगोदर प्रशिक्षण घेवून उत्तीर्ण झाल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच इतर डिग्री कोर्स पुर्ण केलेले लाभार्थ्यांना पण योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे. सदर दिलेला लाभ हा योजनेस अनुसरुन नसुन वसुल करुन निधीत भरणा करुन पुर्तता दर्शवावी

**4.383 एम एस सीआयटी संगणक परिक्षा विहीत कालावधित उत्तीर्ण न झाल्याबाबत.**

**पंचायत समिती उत्तर सोलापूर, जिल्हा सोलापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 14) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

खालील कर्मचा-यांची एम एस सीआयटी संगणक परिक्षा विहीत कालावधीत उत्तीर्ण न झाल्यामूळे वेतनवाढ रोखणे आवश्यक असताना तशी न रोखता वेतनवाढी देण्यात आलेल्या आहेत.

1. श्री दिपक विठ्ठल कोळी, आरोग्य सेवक, प्राथमिक आरोग्य केंद्र, मार्डी. वसूलपात्र रक्कम रूपये 1,32,606/-

2. श्रीमती एस एस इंगळे, आरोग्य सेविका, वसूलपात्र रक्कम रूपये 94,368/-

**4.384 श्री. एम आर काक्रमकर, आरोग्य सेवक यांना आगाउ वेतनवाढ दिल्यामुळे वेतननिश्चिती चुकीची होवून वेतनाचे अतिप्रदान झालेबाबत.**

**पंचायत समिती उत्त्र सोलापूर, जिल्हा सोलापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 17) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) श्री. एम आर काक्रमकर, आरोग्य सेवक, प्राथमिक आरोग्य केंद्र, कळमण यांना 6व्या वेतन आयोगानुसार आगाउ वेतनवाढी बंद करण्यात आलेल्या असताना दिनांक 01/07/2006 पासून आगाउ वेतनवाढ दिल्यामुळे वेतननिश्चिती चुकीची होवून वेतनाचे अतिप्रदान झालेले आहे. तरी सदरची अतिप्रदानीत रक्कम रूपये 1,33,014/- वसूल करण्यात यावी.

2) श्री. एम आर काक्रमकर, आरोग्य सेवक, प्राथमिक आरोग्य केंद्र, कळमण यांना कालबध्द पदोन्नतीचा दुसरा लाभ दिनांक 01/03/2008 पासून देवून करण्यात आलेल्या वेतननिश्चितीमध्ये 6व्या वेतन आयोगानुसार आगाउ वेतनवाढी बंद करण्यात आलेल्या असताना सुध्दा दिनांक 01/07/2006 पासून आगाउ वेतनवाढ दिल्यामुळे वेतननिश्चिती चुकीची होवून वेतनाचे अतिप्रदान झालेले आहे. तसेच सदरचा लाभ प्रत्यक्ष दिनांक 01/03/2013 पासून देण्यात आलेला आहे. त्यामूळे सदर दिनांकापासूनची अतिप्रदानीत रक्कम रूपये 1,52,304/- वसूल करण्यात यावी.

3) सदर पदोन्नतीच्या व वेतननिश्चितीच्या नोंदी सेवापुस्तकामध्ये घेण्यात आलेल्या नाहीत. पदोन्नतीचा आदेश लेखापरिक्षणास उपलब्ध नाही.

4) दुस-या कालबध्द पदोन्नतीच्या पदाच्या श्रेणी वेतनाची (ग्रेड पे) खात्री करण्यात यावी.

**4.385 संगणक अर्हता परिक्षेचे प्रमाणपत्र विहित मुदतीत सादर न करता वेतनवाढी अदा केल्याबाबत.**

**पंचायत समिती पंढरपूर, जिल्हा सोलापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 13) -** पंचायत समिती, पंढरपूर यांचेकडील सन 2016-2017 या लेखापरीक्षण कालावधीमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र तुंगत, कासेगाव यांचेकडील सेवा पुस्तकाचे लेखापरीक्षण केले असता, कर्मचा-यांनी संगणक अर्हता परिक्षेचे प्रमाणपत्र विहित मुदतीत सादर न करुनही त्यांना वेतनवाढी अदा केलेल्या आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) श्री.पी.एन.घोडके, आरोग्य सेवक, (प्राथमिक आरोग्य केंद्र कासेगाव) संगणक परिक्षा एप्रिल 2010 उत्तीर्ण वसुलपात्र रक्कम रूपये 12,936/-

2) श्री.एफ.ए.शेख, आरोग्य सेवक, (प्राथमिक आरोग्य केंद्र तुंगत) संगणक परिक्षा जानेवारी 2013 उत्तीर्ण

श्री.शेख यांची वरील शासन निर्णयाप्रमाणे संगणक परिक्षा सूट/उत्तीर्ण होणेच्या दिनांकापर्यंत जादा अदा करणेत आलेल्या वेतनवाढीची परिगणना करुन वसूलीची कार्यवाही करणेत यावी. तसेच सदरची बाब ही चाचणी लेखापरीक्षणात आढळून आलेली असल्याने वरीलप्रमाणे इतर कर्मचारी संगणक परिक्षा सूट/उत्तीर्ण झालेले नसल्यास त्यांबाबत वरील शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

**4.386 आरोग्य कर्मचाऱ्यांना नियमबाहयपणे जादा कायम प्रवास भत्ता अदा केल्याबाबत.**

**पंचायत समिती वाशिम, जिल्हा वाशिम, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** पंचायत समिती, वाशिम येथील सन 2016-2017 चे लेखापरीक्षणा अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र, तोंडगाव तसेच पार्डी टकमोर तसेच पंचायत समिती आरोग्य विभागा अंतर्गत कार्यरत आरोग्य सेवक/ सेविका आरोग्य सहाय्यक / सहाय्यिका यांचेकडील निवड महिन्यातील वेतन देयकाची तपासणी केली असता 4 प्रमाणकानुसार रक्कम रुपये 10,94,774/- आहरीत व वितरीत केलेल्या वेतन देयकामध्ये आरोग्य सेवक/ सेविका आरोग्य सहाय्यक / सहाय्यिका आदी कर्मचाऱ्यांना कायम प्रवास भत्ता जादा प्रदान झाल्याचे आढळून आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय क्रमांक एएसओ 1090/1491/68/90/ सेवा - 6, दिनांक 19/01/1995 व शासन निर्णय क्रमांक 1002/ प्र.क्र. 151/ सेवा -1, दिनांक 11/10/2006 अन्वये दिनांक 01/04/2006 पासुन 25 टक्के टक्केवाढी नुसार अनुज्ञये ठरते. संपुर्ण विभागातील आरोग्य कर्मचा-यांना परिक्षेत्रा अंतर्गत दौरा संदर्भात कायम प्रवास भत्ता अनुज्ञेय आहे. परंतु, आरोगय सेवक सेविकांना, महाराष्ट्र शासन, निर्णय क्रमांक प्रवास 1010/प्रक2/सेवा-5, दिनांक 03/03/2010 मधील परि. क्रमांक 10 नुसार अदा केलेला कायम प्रवास भत्ता अनुज्ञेय ठरत नाही. सदर शासन निर्णय वित्त विभागाचा असुन यास स्वतंत्रपणे आरोग्य विभागाची मंजुरी घेतलेली नाही.

2) आरोग्य सेवक/सेविका व आरोग्य सहाय्यक यांना रुपये 1,500/- तसेच रूपये 1,650/- दराने कायमप्रवास भत्ता अदा करणेबाबत आरोग्य विभागाचा स्वतंत्र आदेश किंवा शासन निर्णय नाही.

3) शासन निर्णय क्रमांक एएसओ 1090/1491/68/90/ सेवा - 6, दिनांक 19/01/1995 नुसार आरोग्य विभागातील फिरतीचे काम करणाऱ्या कर्मचा-यांना कायम प्रवास भत्ता मंजूर करण्यात आला आहे व शासन निर्णय क्रमांक 1002/ प्र क्र 151/ सेवा -1, दिनांक 11/10/2006 अन्वये कायम प्रवास भत्ता दरात दिनांक 01/04/2006 पासुन 25 टक्के वाढीव दराने दिनांक 19/01/1995 चे शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक 3 मध्ये दिलेल्या अटीच्या अधीन राहून मंजूर केला आहे. दिनांक 01/10/2006 पासून नियमित वेतनात देण्यात यावा, असे आदेश आहेत. परंतु, नियमबाहयपणे 23 कर्मचाऱ्यांना जादा कायम प्रवास भत्ता रक्कम रुपये 24,093/- अदा केलेला आहे.

4) उपरोक्त प्रमाणकांच्या व्यतिरिक्त इतर महिन्यात प्रदान केलेल्या व त्यापुर्वी जादा प्रदान केलेल्या कायम प्रवास भत्ता रक्कम रूपये 24,093 X 12 = 2,89,116/- जादा प्रदान रक्कमेची संबंधीताकडून वसूली करण्यात यावी.

5) सहसंचालक, आरोग्य सेवा संचालनालय, पुणे यांचे पत्र क्रमांक ससंआसे/आरोग्य कर्मचारी/कायम प्रवास भत्ता/ ए 10-04/कक्ष-57, दिनांक 06/03/1996 नुसार सबंधीत कर्मचाऱ्यांना नेमुन दिलेल्या फिरतीच्या दिवसाइतकी फिरती प्रत्येक महिन्यात करणे बंधनकारक असून त्यानुसार नियोजीत फिरती कार्यक्रम व त्यानुसार केलेली फिरती याबाबतच आहरण व संवितरण अधिकारी यांनी प्रमाणित केले नाही.

6) कायम प्रवास भत्ता धारकांनी पुढील महिन्याचा नियोजीत फिरती कार्यक्रम अगोदरच्या महिन्याच्या 10 तारखेपर्यंत खाते प्रमुखाकडे सादर करणे आवश्यक असतांना त्यानुसार कार्यवाही केल्याचे अभिलेखे दर्शविण्यात आले नाहीत.

**4.387 आरोग्य विभागा अंतर्गत कर्मचा-यांना कायम प्रवास भत्याचे अतिप्रदानाबाबत.**
**पंचायत समिती रिसोड, जिल्हा वाशिम, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2)**
**पंचायत समिती मंगरूळपीर, जिल्हा वाशिम, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) व**
**पंचायत समिती कारंजा, जिल्हा वाशिम, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती तालुका आरोग्य अधिकारी व पंचायत समिती अंतर्गत कार्यरत आरोग्य विस्तार अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्रातील पर्यवेक्षक एच. व्ही. आरोग्य सेवक, सेविका आरोग्य सहाय्यक इत्यादी कर्मचाऱ्यांना शासन निर्णय क्रमांक एएसओ 1090/1491/68/90/ सेवा - 6, दिनांक 19/01/1995 व शासन निर्णय क्रमांक 1002/ प्र.क्र.151/ सेवा -1, दिनांक 11/10/2006 अन्वये दिनांक 01/04/2006 पासुन 25 टक्के टक्केवाढी नुसार अनुज्ञये ठरते संपुर्ण विभागातील आरोग्य कर्मचाऱ्यांना परिक्षेत्रा अंतर्गत दौरा संदर्भात कायम प्रवास भत्ता अनुज्ञेय आहे. त्यांना पंचायत समितीने महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, निर्णय क्रमांक प्रवास 1010/प्रक2/सेवा-5, दिनांक 03/03/2010 अन्वये परिच्छेद क्रमांक 10 नुसार कायम प्रवास भत्ता 15 दिवसाचे दैनिक भत्ता रकमेइतके प्रदान करीत आहे. परंतु, यावर अदयाप कोणतेही कार्यवाही किंवा वित्त विभागाची अनुमती असलेले सार्वजनिक आरोग्य विभागाचे शासन आदेशाचे प्रत लेखापरिक्षणास सादर केलेले नाही. त्यामुळे उपरोक्त कर्मचा-यांना अदा केलेला अतिरिक्त कायम प्रवास भत्ता अनुज्ञेय ठरत नाही.

2) आरोग्य विभाग, शासन निर्णय दिनांक 11/10/2006 नुसार सुधारीत दर खालील मंजूर पदाना अनुज्ञेय ठरते:-

| **अ.क्र.** | **पदाचे नांव** | **शासन निर्णय 1995 नुसार असुधारीत कायम प्रवास भत्ता** | **शासन निर्णय 2006 नुसार 25 टक्के वाढीवनुसार अनुज्ञेय कायम प्रवास भत्ता** |
|---|---|---|---|
| 1 | आरोग्य पर्यवेक्षक / वि. अ. आरोग्य | 660/- | 825/- |
| 2 | आरोग्य सहाय्यक (स्त्री / पुरूष) | 583/- | 729/- |
| 3 | कुष्ठरोग तंत्रज्ञ (तालुका) | 600/- | 750/- |
| 4 | आरोग्य पर्यवेक्षक (तालुका) | 600/- | 750/- |
| 5 | विस्तार अधिकारी (तालुका) | 600/- | 750/- |
| 6 | आरोग्य कर्मचारी प्राथमिक आरोग्य केंद्र (स्त्री / पुरूष) | 315/- | 394/- |
| 7 | आरोग्य सहाय्यक (स्त्री / पुरूष) | 530/- | 663/- |
| 8 | स्वास्थ अभ्यंगता (H.V.) | 660/- | 825/- |

उपरोक्त नमुद दरात 25 टक्के वाढीव दराने कायम प्रवास भत्ता अदा न करता प्रत्येकी रूपये 1,500/- प्रमाणे आरोग्य कर्मचा-यांना कायम प्रवास अदा केला आहे. तेंव्हा ज्या दिनांकापासुन अतिरीक्त प्रदान करण्यात आलेल्या कायम प्रवास भत्ता रक्कमेची परिगणना करून संबंधीताकडुन वसुली करण्यात यावे

3) पंचायत समिती, मंगरूळपीर व पंचायत समिती, रिसोड या दोन्ही पंचायत समितीच्या सन 2016-2017 चे लेखापरीक्षणामध्ये वरीलप्रमाणे जादा कायम प्रवास भत्ता रक्कम रूपये 4.59 लाख व रक्कम रूपये 4.33 लाख अनुक्रमे वसूली सुचविलेली आहे सदर रक्कमा वसूल कराव्यात.

4) वाशिम जिल्हा परिषदेमधील सर्व आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांना अदा करणेत आलेला कायम भत्त्याची तपासणी करून जर जादा कायम भत्ता अदा केला असलेस त्याची वसूली करावी.

**4.388 ब्लिचिंग पावडर खरेदीमधील अनियमितता.**

**पंचायत समिती राळेगाव, जिल्हा यवतमाळ, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती, राळेगांव येथील सन 2016-2017 चे आरोग्य विभागाला ब्लिचिंग पावडर करीता एकुण अनुदान रुपये 1,50,000/- प्राप्त झाले. त्या अनुषंगाने रक्कम रुपये 1,49,970/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठादाराचे दरपत्रकाची तपासणी केली असता पुरवठादाने 400 बॅग ब्लिचींग पावडर खरेदी करीता रुपये 125/- प्रती बॅग प्रमाणे दिनांक 25/07/2016 अन्वये मान्य केल्याचे दिसून येते. परंतू, त्याच पुरवठादाने 769 बॅग ब्लिचींग पावडर खरेदीकरीता रुपये 130/- प्रमाणे दिनांक 24/03/2017 रोजी 769 बॅग ब्लिचींग पावडर दरपत्रक मान्य केल्याचे निदर्शनास येते. यावरुन रुपये 5/- प्रमाणे रुपये 3,845/- जादा प्रदान झाल्याचे दिसून येते. सदर रक्कंम वसुल करण्यांत यावी. तसेच सदरचे दरपत्रक हे बाजार भावाशी तूलनात्मक असल्याचे दिसुन येत नाही.

2) साठापुस्तकाची तपासणी केली असता साठापंजी पान क्रमांक 7 वर दिनांक 09/08/2016 रोजी 8 ग्रामपंचायतीना (ग्रामपंचायत देहगांव, पिंपळगांव, आंजी, तेजणी, सावनेर, खैरगांव, किन्ही, वाटखेड) यांना एकूण 110 बॅग ब्लिचींग पावडर वाटप करण्यात आल्याचे दर्शवुन साठापंजी निरंक केले आहे. परंतू, साठा पंजीवर सबंधित ग्रामसेवकांच्या स्वाक्ष-या आढळल्या नाही. यावरुन ब्लिचींग पावडर संबंधीत ग्रामपंचायतीना वाटप केले नसल्याचे स्पष्ट होते. सबब, संबंधीतावर जबाबदारी निच्छित करून एकूण 110 बॅगचे रुपये 125/- प्रमाणे रुपये 13,750/- वसुल करुन शासन खाती जमा करण्यात यावे.

3) सदरची योजना ही 50 टक्के अनुदानावर असल्याने सबंधीत ग्रामपंचायतीकडून रक्कम रुपये 75,000/- वसुल करुन भरणा करावी.

4) सदरचा ब्लिचिंग विक्रेंता हा अधिंकृत विक्रेंता असल्याचे दिसुन येत नाही.

5) सबंधित पुरवठादारासोबत दरकरार केल्याचे नमुद केले आहे परंतु, रुपये 100/- चे स्टँम्प पेपर दरकरार केल्याचे नस्तीमध्ये आढळले नाही.

6) सबंधीत ग्रामपंचायतीना ब्लिचींग पावडरचा पुरवठा केल्यानंतर सदर ब्लिचींग पावडर सबंधी उपयोगीता प्रमाणपत्र नस्तीला आढळून आले नाही.

7) साठा पुस्तकांची तपासणी केली असता 11 ग्रामपंचायतीना एकाच तारखेला ग्रामपंचायतीची कोणतेही मागणी नसतांना एकुण 394 बॅग ब्लिचिंग पावडर वाटप केल्याचे दिसुन येते हया वरुन संबधीत ग्रामपंचायतीना पुरवठा झाला किंवा नाही, याबाबत खुलासा करण्यात यावा.

**4.389 पंचायत समिती अंतर्गत आरोग्य विभागातील वर्ग तीनचे कर्मचाऱ्यांना जादा दराने कायम प्रवास प्रदान केला असून जादा प्रदान रक्कमेची वसूली होणेबाबत.**

**पंचायत समिती घाटंजी, जिल्हा यवतमाळ, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** पंचायत समिती, घाटंजी अंतर्गत आरोग्य विभागाकडील निवड महिन्यातील वेतन देयकाची तपासणी केली असता आहरीत व वितरीत केलेल्या वेतन देयकामध्ये आरोग्य सेवेतील कर्मचाऱ्यांना कायम प्रवास भत्ता जादा दराने प्रदान केल्याचे आढळून आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक 1002/ प्र क्र 151/ सेवा -1, दिनांक 11/10/2006 नुसार सबंधीत कर्मचारी यांना कायम प्रवास भत्ता मंजूर असून महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, निर्णय

क्रमांक प्रवास 1010/प्रक2/सेवा-5, दिनांक 03/03/2010 मधील परिच्छेद क्रमांक 10 नुसार 15 दिवसांचे दैनिक भत्ता रक्कमे इतकी कायम प्रवास भत्त्याची रक्कम नियमबाहयपणे मंजूर केली आहे. त्यामुळे सबंधीत कर्मचाऱ्यांना कायम प्रवास भत्ता रक्कमेचे जादा प्रदान झाले आहे.

2) आरोग्य सहाय्यक यांना रुपये 1,650/- व आरोग्य सेवक (महिला / पुरुष) यांना रुपये 1,500/- या दराने कायम प्रवास भत्ता प्रदान केला आहे. सदरचे दर अनुज्ञेय नसतांना नियमबाहयपणे जादा दराने प्रदान केल्यामुळे सबंधीत कर्मचारी यांना जादा प्रदान झाले आहे जादा प्रदान रक्कमेची सबंधीत कर्मचाऱ्याकडून वसूली होणे आवश्यक आहे.

3) शासन निर्णय क्रमांक एएसओ 1090/1491/68/90/ सेवा - 6, दिनांक 19/01/1995 नुसार आरोग्य विभागातील फिरतीचे काम करणाऱ्या कर्मचा-यांना कायम प्रवास भत्ता मंजूर करण्यात आला आहे व शासन निर्णय क्रमांक 1002/ प्र क्र 151/ सेवा -1, दिनांक 11/10/2006 अन्वये कायम प्रवास भत्ता दरात दिनांक 01/04/2006 पासुन 25 टक्के वाढीव दराने दिनांक 19/01/1995 चे शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक 3 मध्ये दिलेल्या अटीच्या अधीन राहून मंजूर केला आहे दिनांक 01/10/2006 पासून नियमित वेतनात देण्यात यावा, असे आदेश आहेत. त्यानुसार खालील दराप्रमाणे कायम प्रवास भत्ता अनुज्ञेय ठरतेः-

| **अ.क्र.** | **पदाचे नांव** | **शासन निर्णय दिनांक 1995 नुसार असुधारीत अनुज्ञेय कायम प्रवास भत्ता (रूपये)** | **शासन निर्णय दिनांक 2006 नुसार 25 टक्के वाढीवनुसार कायम प्रवास भत्ता (रूपये)** |
|---|---|---|---|
| 1 | आरोग्य सहाय्यक.(स्त्री/पुरुष) | 530/- | 663/- |
| 2 | आरोग्य सेवक प्राथमिक आरोग्य केंद्र (स्त्री/पुरुष) | 315/- | 394/- |

वरील दराप्रमाणे कायम प्रवास भत्ता रक्कमेचे प्रदान न करता दरमहा रुपये 1,650/- व 1,500/- या दराप्रमाणे कायम प्रवास भत्ता प्रदान केला आहे. त्यामुळे संबंधीताना जादा प्रदान रक्कम रूपये 2,56,872/- वसूली करण्यात यावी.

4) याशिवाय पंचायत समिती स्तरावरील, प्राथमिक आरोग्य केद्रांतील व तालुका आरोग्य अधिकारी यांचेकडील वेतन देयकात प्रदान केलेल्या व त्यापुर्वी जादा दराने प्रदान केलेल्या कायम प्रवास भत्ता रक्कमेची आपले स्तरावर परिगणना करुन जादा प्रदान रक्कमेची संबंधीताकडून वसूली करण्यात यावी.

5) सहसंचालक, आरोग्य सेवा संचालनालय, पुणे यांचे पत्र क्रमांक ससंआसे/आरोग्य कर्मचारी/कायम प्रवास भत्ता/ एए 10-04/कक्ष-57, दिनांक 06/03/1996 नुसार सबंधीत कर्मचाऱ्यांना नेमुन दिलेल्या फिरतीच्या दिवसाइतकी फिरती प्रत्येक महिन्यात करणे बंधनकारक असून त्यानुसार नियोजीत फिरती कार्यक्रम व त्यानुसार केलेली फिरती याबाबतच आहरण व संवितरण अधिकारी यांनी प्रमाणित केले नाही.

6) कायम प्रवास भत्ता धारकांनी पुढील महिन्याचा नियोजीत फिरती कार्यक्रम अगोदरच्या महिन्याच्या 10 तारखेपर्यंत खाते प्रमुखाकडे सादर करणे आवश्यक असतांना त्यानुसार कार्यवाही होत असल्याचे अभिलेखे दर्शविण्यात यावेत.

**4.390 अत्यंत आवश्यक औषधी खरेदी**

**पंचायत समिती आर्वी, जिल्हा वर्धा सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** सदरबाबत 4 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 1,22,393/- खर्च करण्यात आला आहे. प्राथमिक आयोग्य केंद्र गिरड, नंदोरी, मांडगाव यांनी आपल्या स्तरावरुन अत्यंत आवश्यक असणारे औषधी खरेदी केलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) दरपत्रक नस्ती तपासली असता, महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4, दिनांक 01/12/2016 मधील परिशिष्ठ 4.2 नुसार दरपत्रक प्रक्रिया राबविलेली नाही. दरपत्रकासोबत खालील पूरावे जोडणे आवश्यक होते.

2) तीनही निविदाकारांनाकडून अधिकृत विक्रेता/ वितरक / पुरवठाधारक असल्याबाबत प्रमाणपत्र प्राप्त करण्यात आलेले नाही.

3) तीनही निविदाकारांचे दुकानाचा परवाना, अन्न व द्रव्य यांच्याकडे नोंदणी असल्याचे अद्यावत प्रमाणपत्र जोडण्यात आलेले नाही.

4) तीनही निविदाकारांनाचे विक्रीकर (VAT) नोंदणी प्रमाणपत्र, तसेच VAT clearance certificate जोडण्यात आलेले नाही.

5) तीनही निविदाकारांनाचे Income tax returned certificate जोडण्यात आलेले नाही. तीनही निविदाकारांनाचे पॅन कार्ड जोडण्यात आलेले नाही.

दरपत्रके बोलाविताना वरीलपैकी एकही बाबीची पूर्तता झालेली नाही. त्यामुळे औषधी खरेदीचे दर हे, योग्य असल्याची लेखापरीक्षणास खात्री झालेली नाही.

**4.391 औषधी खरेदीबाबत. (प्राथमिक आरोग्य केंद्र, विजयगोपाल)**

**पंचायत समिती देवळी, जिल्हा वर्धा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 13) -** सदर बाबत प्रमाणक क्रमांक 623, दिनांक 31/03/2017 अन्वये रक्कम रूपये 18,449/- खर्च करण्यात आला आहे. पंचायत समितीचे सन 2016-2017 च्या लेखापरीक्षणात उपरोक्त प्रमाणकांची तपासणी केली असता प्रमाणकानुसार तीन दरपत्रके बोलवुन औषधी खरेदी करुन रकमेचे शोधन केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्राथमिक आरोग्य केंद्र, विजयगोपालनी उपरोक्त औषधी प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर खरेदी केलेले असुन खरेदी केलेले औषधी जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, वर्धा यांच्याकडे या औषधी उपलब्ध नसल्याबाबत प्रमाणपत्र घेणे व औषधी खरेदीची मंजुरी घेणे आवश्यक होते. परंतु, मंजुरी न घेता औषधी खरेदी केल्यांचे दिसुन येते.

2) औषधी खरेदीकरीता तीन दरपत्रके बोलविण्यात आलेली असुन दरपत्रके कधी उघडण्यात आली? याबाबत दिनांक नमुद नाही. तसेच दरपत्रक मंजुर करुन पुरवठा आदेश देणे आवश्यक असतांना पुरवठा आदेश दिलेला नाही.

3) साठा पुस्तक सादर केले नसल्याने खरेदी केलेल्या औषधीची नोंद साठा पुस्तिकेत घेतल्याची खात्री करता आली नाही.

**4.392 किरकोळ रोखपुस्तक न ठेवल्याबाबत**.

**पंचायत समिती गोंदिया, जिल्हा गोंदिया, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 17) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

प्राथमिक आरोगय केंन्द्र दासगाव यांनी सन 2016-2017 या आर्थिक वर्षात पंचायत समिती मार्फत तसेच जिल्हा परिषदे मार्फत प्राप्त झालेल्या रकमांचे व्यवहाराचे नमुना 4 मधिल किरकोळ रोखपुस्तक सर्व अदयावत नोंदी घेवून ठेवणे आवश्यक आहे. प्राथमिक अरोग्य कैंद्र दासगाव यांना पंचायत समिती मार्फत एकुण रुपये 26,71,902/- इतके प्रदान करण्यात आलेले आहे. सदर रकमेबाबत रोखपुस्तक न ठेवल्यामुळे व्यवहार योग्य झाल्याचे खात्री होत नाही. रोखपुस्तक न ठेवणे हे अत्यंत गंभीर बाब आहे.

**4.393 ग्रामपंचायतींना 50% सुटीवर ब्लीचींग पावडर खरेदी व पुरवठा / वाटप करणेतील नियमबाहयतेबाबत**.

**पंचायत समिती गोंडपिपरी, जिल्हा चंद्रपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12) -** सदरबाबत रक्कम रूपये 3,34,262/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे पत्र क्रमांक 187 दिनांक 04/02/2016 नुसार 39 ग्रामपंचायतींना प्रती वार्षिक 50 टक्के अनुदान रूपये 4,285/- प्रमाणे रूपये 1,67,131/- प्राप्त झाले आहेत. म्हणजेच 50 टक्के स्वनिधी असे एकून रूपये 3,34,262/- एवढया रकमेची खरेदी महाराष्ट्र शासन खरेदी नियमपुस्तिका दिनांक 30/10/2015 सुधारीत डिसेंबर 2016 नुसार रूपये 3 लक्षावरील खरेदी कोणत्याही स्थितीत तुकडे पाडून न करता ई-टेंडर पध्दतीनेच करणे आवश्यक असताना पंचायत समितीने खरेदीचे तुकडे पाडून नियमबाहयरीत्या खरेदी केली आहे.

2) खरेदीची जाहीरात ग्रामविकास विभाग, शासन निर्णय दिनांक 31/12/2009 च्या कोष्टक 1 नुसार जिल्हा स्तरीय 1 क वर्ग दैनिक तसेच 1 क वर्ग साप्ताहीक मध्ये जाहीरात दिलेली नाही.

3) ग्रामपंचायतीकडून ब्लीचींग पावडर बॅग आवश्यक्यतेची मागणी केल्याचे दिसून आले नाही.

4) साठा पुस्तकामध्ये साहित्य कोणत्या दिनांकाला प्राप्त झाले, कोणत्या दिनांकाला व किती वाटप केले देणाऱ्या व घेणा-याची सही व नाव नाही. संबंधीत कालावधीत संवर्ग विकास अधिकारी यांनी सुध्दा साठा पुस्तक तपासल्याचे निदर्शनास आले नाही.

5) साठा पुस्तक पान क्रमांक 10-11 नुसार 172 बॅग वाटप केल्याचे दिसून येते म्हणजे 608 बॅग शिल्लक असणे आवश्यक असताना शिल्लक दिसून येत नाही. त्यामुळे 608 बॅगचे रूपये 130/- प्रमाणे रूपये 79,040/- संबधिताकडून वसूल होणे आवश्यक आहे.

6) मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे पत्र क्रमांक 187 दिनांक 04/02/2016 नुसार 39 ग्रामपंचायतीकरीता निधी प्राप्त असताना फक्त 21 ग्रामपंचायतीला कमी प्रमाणात ब्लीचींग पावडर बॅग वाटप केल्याचे दिसून येते.

7) लाभार्थी हिस्सा ग्रामपंचायतीने जमा केल्याचे लेखापरीक्षणास निदर्शनास आले नाही.

8) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 सी नुसार अष्टभुजा केमीकल, गडचिरोली यांचे देयकातून आयकर कपात न केल्यामुळे आयकर रूपये 2,028/- संबधीतांकडून वसूल करून लेखाशीर्षात जमा करावे.